# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/परीक्षा अर्ज/निकाल कक्ष/ ३५३ /२०२२, दि. २४ फेब्रुवारी, २०२२

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या संलग्नीत/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक/प्रमुख यांना या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, कला, वाणिज्य व विज्ञान अभ्यासक्रमातील ज्या परीक्षांची (Yearly Pattern 100 Marks, 60: 40 & 75:25) ऑक्टोबर, २०१८ ही शेवटची संधी होती व जुन्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी १० वर्षात पदवी पूर्ण करू शकले नाही अशा विद्यार्थ्यांकरीता मे/जून, २०२२ (उन्हाळी–२०२२) ही शेवटची संधी देण्यात येत आहे. **यानंतर या परीक्षेतील विद्यार्थ्यांकरीता कोणतीही संधी देण्यात येणार नाही याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

उपरोक्त विद्यापीठाच्या निर्णयाच्या अनुषंगाने महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षेत (सत्र–१ ते ४) अनुत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर नवीन अभ्यासक्रमातील समकक्ष विषय देवून परीक्षा घेण्यात याव्यात. याकरीता समकक्ष विषयाबाबत महाविद्यालयातील संबंधित विभाग प्रमुख व प्राचार्य यांनी समकक्ष विषय देण्याबाबत निर्णय घ्यावेत. तसेच विद्यापीठ स्तरावर असलेल्या परीक्षेकरीता (सत्र–५ व ६) विद्यापीठास नवीन अभ्यासक्रमानुसार समकक्ष विषय घेवून परीक्षा प्रवेश अर्ज सादर करावेत.

उपरोक्त परीक्षेचे वेळापत्रक स्वतंत्रपणे निर्गमित होईल. तसेच सदर परीक्षा Offline घेण्यात येईल.

उपरोक्त नमुद विद्यापीठ परीक्षाकरीता खालीलप्रमाणे विद्यापीठाकडे परीक्षा प्रवेश अर्ज Manually सादर करावेत.

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या तारखा | परीक्षा विभागाकडे परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क जमा करण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २५/०२/२०२२ ते २३/०३/२०२२ | २५/०३/२०२२<br>(दुपारी ५.०० वाजेपर्यंत) |

तरी वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विद्याशाखा/अभ्यासक्रम/सत्र निहाय परीक्षा प्रवेश अर्ज परीक्षा शुल्क वित्त व लेखा विभागात भरून परीक्षा विभागात वरील तारखांप्रमाणे हस्तेपोच जमा करण्यात यावेत. **पोस्टाने अथवा कुरीअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही.**

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज जमा करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे छायाचित्र, स्वाक्षरी, नाव (मराठी व इंग्रजी या दोन्ही लिपीत), माध्यम, परीक्षा केंद्र, विषय व दिव्यांग (Person with disability) इ. बाबी बरोबर आहेत, याची खात्री करून घ्यावी. सदर माहिती गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्र यासाठी वापरण्यात येणार आहे. परीक्षा अर्ज जमा झाल्यावर वरील कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत वाढवून दिली जाणार नाही याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी. तसेच यासदर्भात प्रशासनातील वरीष्ठांकडे विनंती करून त्यांचा अमुल्य वेळ वाया घालवू नये ही विनंती.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

स्थळ : मुंबई.
दि. : २४/०२/२०२२.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ